**नि.दि.दा.क्र.४५/२०१८**
**कृष्णा व ललिता**
**नि.क्र.९२**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.२ ची साक्ष</u>**

**मी प्रतिज्ञापुर्वक कथन करतो की**
माझे नाव - इम्रान राजुद्दीन शेख
वय - ३७ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा. सोनगिरवाडी वाई, तालुका वाई.

**<u>सरतपासणी वादीतर्फे विधिज्ञ श्री आर. आर. सांगलीकर</u>**

मी उपविभागीय अधिकारी वाई या कार्यालयात महसुल सहाय्यक या पदावर कार्यरत आहे. तेथे मी मागील तीन वर्षांपासुन कार्यरत आहे. मी सन २०१२ साली सेवेत रुजु झालो होतो. नि.क्र.८९ वरील साक्ष समन्सच्या अनुषंगाने मी नि.क्र.९१ वरील दस्त यादीसह अर्जदार / प्रतिवादी यांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे दस्त मिळुन येत नसल्याबाबत दिलेले पत्र दाखल केले आहे. त्या अनुषंगाने दि. १८.०६.२०२४ रोजी उपविभागीय कार्यालय वाई यांनी मा. न्यायालयाला दिलेले मुळ पत्र आता मला दाखविण्यात आले. ते तेच असुन त्यावर नायब तहसीलदार वैभव पवार यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. श्री वैभव पवार यांची सही मी ओळखतो कारण आमच्या कार्यालयात त्यांना पत्र व्यवहारावर सही करण्याचे अधिकार दिलेले आहेत. नि.क्र.५३ वरील वादीच्या पुर्वहक्कदारांनी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने दि. १८.०६.२०२४ रोजीच्या प्रस्तुतच्या पत्रान्वये खुलासा करण्यात आलेला आहे. सदरील पत्र **नि.क्र.९३** वर आहे. नि.क्र.५३ वरील पत्रावर आमच्या कार्यालयाचा शिक्का व संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांची सही आहे.

सरतपास पुर्ण

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्रीमती एम. एस. सावंत</u>**

२. नि.क्र. ९३ वरील पत्रानुसार आमच्या कार्यालयात कोणतेही कागदपत्र उपलब्ध नसल्याबाबत कळविण्यात आले आहे. हे म्हणणे खरे आहे की कुठल्याही पत्रावर अभिप्राय देण्याचे काम माझे नाही. माझी जन्मतारीख दि. २२.१०.१९८७ आहे.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास काहीही नाही.**

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

*स्वाक्षरी/-*

(आर. एम. भेंडे)
दिनांक :- १८/०६/२०२४
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश,
वाई, जि. सातारा.